ॐ

# ज्ञान प्रबोधिनी

सौर वैशाख १९४० चे

## मासिक वृत्त

सौर ज्येष्ठ १, शके १९४० दि. २२/५/२०१८

### मा. संचालकांचे प्रश्नोत्तर-रूप चिंतन

**प्रश्न :** स्वयंपौरोहित्य म्हणजे काय? तो फक्त आदर्श आहे की ते व्यवहार्य आहे?

**उत्तर :** उपलब्ध प्रमाणित संस्कार पोथ्या वापरून स्वतःकडच्या कार्यक्रमांमध्ये स्वतः पौरोहित्य करणे असे स्वयंपौरोहित्य प्रबोधिनीला अपेक्षित आहे. अशा स्वयंपौरोहित्यामध्ये कदाचित प्रशिक्षित पुरोहिताइतकी उच्चारांची शुद्धता, तांत्रिक अचूकता किंवा पठणातील आणि कृतींमधील सहजता नसेल. परंतु त्याची भरपाई स्वावलंबनाच्या आनंदातून होते. असे स्वयंपौरोहित्य करणाऱ्यांना प्रबोधिनी कायम प्रोत्साहन देते. प्रबोधिनीत प्रशिक्षित झालेल्या पुरोहितांनी देखील स्वयंपौरोहित्याचा पुरस्कार करायला हवा.

धर्मकार्यातील स्वावलंबन हे पुरोहितशाहीच्या जुन्या रोगावरचे एक औषध आहे. ते स्वयंपौरोहित्यातून साधते. असे स्वयंपौरोहित्य आजही अनेक जण करत असतात. त्यामुळे ते नक्कीच व्यवहार्य आहे. सर्व कौटुंबिक व सार्वजनिक पूजा, संस्कार व शांतींमध्ये संयोजक किंवा यजमानांनी स्वयंपौरोहित्य करणे हा मात्र आदर्श आहे. आदर्श सतत समोर ठेवला की तो व्यवहारात आणणाऱ्यांची संख्या वाढत जाते.

धार्मिक विधींचे पुरोहित जोपर्यंत धार्मिक विधी करण्यामध्ये लोकांची अडवणूक करत नाहीत किंवा दिशाभूल करत नाहीत तो पर्यंत धार्मिक विधी पुरोहितांनी करणे ही समाजातली एक सोय असते. परंतु अडवणूक, दिशाभूल किंवा आर्थिक लूट करणाऱ्या पुरोहितांची संख्या, पुरोहित संस्थेची बदनामी करण्याइतकी वाढली, तर धार्मिक विधी करण्याचे वेगळे पर्याय शोधून काढावे लागतात. जाणकार, अडवणूक न करणारे, पैशाचा लोभ नसणारे, दिशाभूल न करणारे, असे नवे पुरोहित प्रशिक्षित करणे, हा या समस्येवरचा एक मार्ग आहे. आपल्या कुटुंबाच्या, मंडळाच्या किंवा संस्थेच्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये स्वतः पौरोहित्य करणे हा दुसरा मार्ग आहे.

कोणत्याही विद्यापिठाचा पदवीदान समारंभ कसा झाला पाहिजे हे ठरलेले असते. पदवीधरांची मिरवणूक कशी असावी, त्यांचा उभे राहण्याचा क्रम कसा असावा, व्यासपिठावर कोणी कुठे बसावे, बोलण्याचा क्रम काय असावा, कोणी कोणती वाक्ये बोललीच पाहिजेत, हे सगळे ठरलेले असते. या सगळ्या पद्धतीला एकत्रितपणे पदवीदान समारंभाचा विधी असे म्हणतात. या विधीचा जो जाणकार आहे तो दरवर्षी वेगवेगळ्या लोकांकडून त्याच पद्धतीने पदवीदान समारंभ घडवून आणतो. त्याला इंग्रजीत Master of ceremony असे म्हणतात. यालाच आपल्याकडचा पूर्वीपासूनचा शब्द पुरोहित असा आहे.

एखादा कार्यक्रम वर्षानुवर्षे, अनेक वेळा, अनेक ठिकाणी, ठरलेल्या पद्धतीने झाला, की त्यातून सातत्याची जाणीव निर्माण होते. सातत्याची जाणीव समाधान देणारी असते. त्यातून स्थैर्याची भावना निर्माण होते. पदवीदान समारंभ हा लौकिक विधी आहे. तो ठराविक पद्धतीने केल्याचा जसा उपयोग होतो तसाच उपयोग धार्मिक विधी ठराविक पद्धतीने केल्याने होतो. अनेक लोकांना लौकिक विधींपेक्षा धार्मिक विधी ठराविक पद्धतीने केल्यामुळे स्थैर्याची व समाधानाची जाणीव जास्त लवकर व जास्त प्रमाणात होते. ही जाणीव स्वयंपौरोहित्यातूनही होते. त्यासाठी कोणावर अवलंबून राहावे लागत नाही.

गिरीश श्री. बापट
संचालक

### अभिनंदन

**♦ जैव तंत्रज्ञानासाठी पुरस्कार ♦**

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे विज्ञान भवन येथे ‘२० व्या तंत्रज्ञान दिवसा’ चा कार्यक्रम झाला. यामध्ये ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथील प्रा. संगीताताई कुलकर्णी यांना जैवतंत्रज्ञान विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागात प्रचार-प्रसार करण्यासाठी केंद्रीय मंत्री डॉ. हर्षवर्धन यांच्या हस्ते ‘जैवतंत्रज्ञान सामाजिक विकास पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आले.

ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथे २००२ पासून जैवतंत्रज्ञान विषय प्रा. संगीता कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने चालू आहे. प्रा. कुलकर्णी जैवतंत्रज्ञान दूत म्हणूनच ज्ञान प्रबोधिनीत काम करतात. इ. आठवीपासून हा विषय शिकविला जातो. आत्तापर्यंत १५०० हून अधिक विद्यार्थ्यांना जैव तंत्रज्ञान विषयात गोडी निर्माण व्हावी, अशा प्रयोगशील पद्धतीने शिकविण्यात आलेला आहे. यासह शेतकरी, बचत गटातील महिला, ग्रामस्थांना जैव तंत्रज्ञानाचे विविध उपयोग आणि फायदे सांगण्यात आले. याची दखल केंद्रीय जैव तंत्रज्ञान विभागाने घेतली.

**♦ छात्र प्रबोधन ♦**

छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक व दिनमार्क पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी अंक २०१७ च्या स्पर्धेतील स्व. कमलाबाई रसिकलाल धारीवाल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा या वर्षीचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार यंदा छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकास मिळाला आहे.

रोटरी लोकमान्य दिवाळी अंक २०१७ चा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार देखील यंदा छात्र प्रबोधनला मिळाला आहे.

### ♦ समतोल दिवाळी अंक ♦

संवादिनी संपादित समतोल दिवाळी अंक २०१७ ला रोटरी लोकमान्य दिवाळी अंक २०१७ चा कौटुंबिक विभागातील तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

### ♦ कै. काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजकता पुरस्कार ♦

दर वर्षी प्रमाणे २०१७-१८ या वर्षीच्या कै. काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजकता पुरस्काराचे वितरण या वेळी शिवापूर येथे राम-सीता पुराणिक तंत्रनिकेतनात झाले. स्वतःचे हॉटेल चालवून चार जणांना रोजगार दिला आहे अशा सौ. लीला कोंडे यांना उद्योजकता पुरस्कार, तर कविता रेणुसे (शेवई उद्योग) व हर्षदा शिंदे (कापडी पिशव्या उत्पादन) या दोघींना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमास श्री. अनिल व सौ. अनुराधा सुपनेकर, श्री. शशिकांत सुपनेकर उपस्थित होते. मा. कार्यवाह सुभाषराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

---

## कै. डॉ. वसंत सीताराम (आण्णा) ताम्हनकर प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम

ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक आदरणीय आण्णा तथा कै. डॉ. व. सी. ताम्हनकर यांचा प्रथम पुण्यस्मृतिदिन दि. १३ मे २०१८ रोजी सोलापूरच्या रंगभवन इथे संपन्न झाला.

आदरणीय वा. स्वर्णलता भिशीकर यांच्या धीरगंभीर आवाजात बरोबर ४.३० ला कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर मा. आण्णांच्या पुणे, सोलापूर व हराळी येथील कार्याचा आढावा आदरणीय महेंद्रभाई सेठिया, अमोलदादा गांगजी व अभिजितदादा कापरे यांनी अतिशय समर्पक अशा शब्दात घेतला 'चिरवसंत स्मृतिवन' या स्मरणिकेचे प्रकाशन विवेकानंद केंद्राच्या उपाध्यक्षा पद्मश्री निवेदितादाई भिडे यांच्या हस्ते झाले. मा. शरदराव सुंकर यांनी स्मरणिकेचा आढावा आपल्या खास वक्तृत्व शैलीत घेतला. मा. निवेदितादाईंनी त्यांच्या कार्यकर्ता-जीवनात सुरुवातीच्या काळातील अण्णांच्या बाबतीत अनुभवलेला आपलेपणा- आत्मीयता यांचे वर्णन करत जिव्हाळ्याची शिस्त आणि झोकून देणे या दोन गुणांबद्दल सांगितले. मा. संचालकांनी समारोपात काही आठवणी सांगितल्या. प्रेरणास्रोतांचे वाहक आपण व्हायला हवे असे सांगितले.

त्यानंतर मध्यंतरात कार्यक्रमाला उपस्थित पुणे, शिवापूर, निगडी, सोलापूर, हराळी व देश-विदेशातून आलेल्या सर्व विद्यार्थी, कार्यकर्ते, हितचिंतक अशा सर्वांनी गप्पा, हितगुज केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कै. आण्णांच्या आवडणाऱ्या पद्य व अभंगांचा 'स्वरवंदना' हा कार्यक्रम झाला. मा. गायत्रीताई सेवक यांनी कार्यक्रमाचे निवेदन/ निरूपण केले. मिलिंद संत, समीर दुबळे, अमोल निसळ, दीपा औरंगाबादकर, कल्पना भालेकर-आठल्ये, नेहा जोशी अशा आण्णांच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत भावपूर्ण असा कार्यक्रम सादर केला.

---

## मध्यवर्ती कार्यक्रम : युवती विभाग - गोवा अभ्यास सहल

सौर वैशाख १४ ते १९ (४ ते ९ मे) या कालावधीत प्रबोधिनीच्या पुणे, निगडी, सोलापूर, हराळी आणि वेल्हे या पाच केंद्रांवरील अठरा युवतींची अभ्यास सहल गोवा इथे झाली. आपापल्या ठिकाणी किशोरी आणि युवती गटावर काम करणाऱ्या मार्गदर्शिका व विभागप्रमुख यामध्ये सहभागी झाल्या होत्या. विविध ठिकाणी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ओळख होणे, आपल्या विविध अनुभवांविषयी देवाण-घेवाण होणे, एकत्र कामाच्या संधी दिसणे, एकमेकींचे विचार समजून घेणे आणि त्यातून चालू काम आणखी मोठे करायची प्रेरणा मिळवणे, या हेतूने हा गट एकत्र जमला होता. सौर वैशाख १४ (४ मे) रोजी मा. संचालकांबरोबर सर्व गटाची बैठक झाली. यामध्ये संचालकांनी सहलीचा उद्देश, युवती संघटन मुख्य आणि त्यातून होत जाणारे सहभागी सदस्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन, तसेच 'स्व'च्या पलीकडचा विचार याविषयी सविस्तर मांडणी केली. या सहलीत गोव्यातल्या भेटींसोबतच विविध विषयांवर गटात वाचन, चर्चा व्हाव्यात असे नियोजन केले होते. सर्वसाधारण प्रबोधिनीपण, प्रबोधिनीने स्वीकारलेले चार आदर्श राष्ट्रपुरुष, युवतींच्या पथकांना ज्यांची नावे दिली जातात अशा आदर्श स्त्रिया, हिंदुत्व आणि भारतीयत्व या संकल्पना, उत्तरदायी कार्यकर्ता म्हणजे काय?, ज्ञान प्रबोधिनीच्या प्रार्थनेचा अर्थ अशा विषयांवर चर्चा झाली. 'जिज्ञासापूर्ती' या मा. संचालकांच्या प्रश्नोत्तररूप चिंतन पुस्तिकेत वरील विषयांसंदर्भात असलेल्या लेखनाचे वाचन झाले. तसेच गौरी कापरे, प्रतिभा स्वामी, अस्मिता बारसावडे आणि अनघा देशपांडे या ज्येष्ठ युवतींनी त्यांना जाणवलेले स्वतःच्या कामातले प्रबोधिनीपण आणि त्यांचे अन्य संस्थांमधले आणि प्रबोधिनीतल्या वेगवेगळ्या विभागांमधले कामाचे अनुभव, याविषयी गटासोबत संवाद साधला. ही अनुभवकथने सर्व गटासाठी प्रेरणादायी आणि आपण आत्ता जे काम करतो आहोत, ते का व कसे करतो आहोत यावर विचार करायला लावणारी ठरली. एका सत्रामध्ये सर्वांनी आपण करत असलेले काम आणखी दहा वर्षांनी कसे असेल याविषयीची आपली स्वप्नं गटात सगळ्यांना सांगितली आणि अन्य सर्वांनी ते स्वप्न पूर्ण करण्यात आपला सहभाग कसा असेल असा प्रतिसाद दिला.

सौर वैशाख १५ ते १८ (५ ते ८ मे) या कालावधीत गोव्यामध्ये डॉ. दत्ताराम देसाई (सामाजिक कार्यकर्ते), श्री. रमेश तवडकर (माजी कृषी व क्रीडामंत्री), श्री. दत्तप्रसाद शिरसाट (वरिष्ठ डेप्युटी अकाऊंटंट जनरल, गोवा), श्री. जितेंद्र आमशेकर (शिक्षक), श्री. चिन्मय आमशेकर (संस्कृत भारतीचे कार्यकर्ते) अशा व्यक्तीभेटी आणि राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्था (श्री. गोविंद रानडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ), मातृछाया मुलींसाठीचा अनाथाश्रम (कालिंदीताई जोशी, कार्यवाह) व पोर्ट ट्रस्ट (श्री. प्रदीप बांधेकर, सहा. सचिव मानव संसाधन विभाग व श्री. विष्णू मुरुडकर) या संस्था भेटी झाल्या. या शिवाय गोव्यातील नऊ परिचितांकडे गटशः गृहभेटी झाल्या. विविध केंद्रांवरील युवती एकत्र असल्याने कार्यकर्त्यांचे आणि कार्यपद्धतीचे वैविध्य या सहलीत अनुभवायला मिळाले. या गटाचा हेतू या सहलीतून नक्कीच साध्य झाला.

## शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र –** सौर वैशाख ८ व १३ (दि. २८ एप्रिल व ३ मे) रोजी भारतीय विद्याभवन यांच्या दोन शाळांमधील १३० शिक्षकांसाठी, वर्गव्यवस्थापन व प्रभावी अध्यापन या विषयावर प्रशिक्षण वर्ग झाला.

सौर वैशाख १७ ते २२ (दि. ७ ते १२ मे) या कालावधीत 'रूप पालटू शिक्षणाचे' याच्या अंतर्गत शिक्षकांसाठी निवासी शिबिराचे आयोजन ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे करण्यात आले होते. या शिबिराला सांगली, सातारा, रत्नागिरी, ठाणे, अहमदनगर, बीड, लातूर, जळगाव, पुणे असे एकूण नऊ जिल्ह्यांतून २७ शिक्षक उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनी पुणे व निगडी केंद्रातील साधन व्यक्तींनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

**शैक्षणिक साधन केंद्र –** ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्रातर्फे www.learnprabodhiniway.com हे शिक्षकांसाठी ऑनलाइन कोर्सेसचे पोर्टल विकसित करण्यात आले. यातून ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण आणि अध्यापन पद्धतीची ओळख होईल. तसेच आपल्या वेळेनुसार आणि क्षमतेनुसार शिकता येईल. कौशल्य विकसन आणि आशयावर आधारित अभ्यासक्रम मराठी आणि इंग्रजी भाषेत येथे उपलब्ध आहेत. अध्ययन कौशल्ये, वर्ग व्यवस्थापन, मूलभूत गणित, मराठी भाषा अध्ययन हे चार अभ्यासक्रम सौर ज्येष्ठ ११(१ जून) पासून उपलब्ध होतील.

## प्रज्ञा मानस संशोधिका

प्रज्ञा प्रबोध वर्गाचे सौर वैशाख ११ ते १५ (१ ते ५ मे) दरम्यान ३३ मुलांचे व सौर वैशाख १८ ते २२ (८ ते १२ मे) दरम्यान ३२ मुलींचे शिबिर पार पडले. आदित्य दादाची संवाद कौशल्य, प्रसन्ना अलोणे यांचे पपेट शो व शीतलताई यांची पोवाडा विषयावरील कार्यशाळा झाली. अटल टिंकरिंग च्या कल्पेशदादा व संध्याताई यांनी 'तंत्रज्ञान' विषयावर कार्यशाळा घेतली. रात्री '७२ मैल एक प्रवास' चित्रपटातील काही भाग दाखवून चर्चा झाली. सायकल सहलीचं अनुभव कथन ऋचा मापारी व अवधूतदादा यांनी केले. मुलांच्या शिबिरात 'शिवचरित्र कसे अभ्यासावे' याची मांडणी शिवराजदादा याने केली तर मुलींच्या शिबिरात 'कार्व्हर चे कथाकथन' श्री. शरदराव सुंकर यांनी मांडले. मुलांची क्षेत्रभेट 'Volkswagen' या कंपनीला तर मुलींची 'अभिनव फार्मस् क्लब' येथे झाली. या व्यतिरिक्त सकाळ, संध्याकाळचे दल, उपासना, वैचारिके, Logo Designing, Theatre games, बौद्धिक खेळ ही सत्रे झाली. मुलींच्या शिबिरात वा. अनघाताई लवळेकर यांनी 'भाविक प्रतिभा' या विषयावर सत्र घेतले. मा. संचालकांनी दोनही शिबिरात आवर्जून भेट दिली व मुलांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधला. शेवटच्या दिवशी पालकांची कार्यशाळा झाली.

सौर वैशाख २६ व २७ (१६ व १७ मे) रोजी कोची येथे पार पडलेल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शाळांच्या शिक्षकांच्या परिषदेत प्रज्ञा मानस संशोधिकेतील क्षमाताई दातार व आकाश चौकसे यांचा शोधनिबंध सादर झाला. प्रज्ञा प्रबोध वर्गाच्या प्रयोगातून प्रज्ञावंतांच्या शिक्षणाबद्दल शालेय पातळीवर सर्व शाळांना काय योजना करता येईल? या प्रश्नाभोवती हा निबंध लिहिला होता. राष्ट्रीय पातळीवर सात विशेष निबंधांची निवड करण्यात आली होती त्यात हा निबंध होता.

## नागरी वस्ती विकास विभाग

**युवती मेळावा –**ज्ञान प्रबोधिनी भवनामध्ये सौर वैशाख १ (२१ एप्रिल) रोजी युवती मेळावा झाला. हा मेळावा १०वी व त्यापुढील शिक्षण घेणाऱ्या युवतींसाठी होता. पाच वस्त्यांमधून २२ युवती व नागरी वस्ती अभ्यास गटाच्या १५ कार्यकर्त्या असे मिळून ३७ जणी मेळाव्यात सहभागी झाल्या.

**किशोरी मेळावा –** ज्ञान प्रबोधिनी भवनामध्ये सौर वैशाख २ (२२ एप्रिल) रोजी नवीन वर्षातील पहिला किशोरी मेळावा झाला. सातचाळ वसाहत व दहाचाळ येथून ११, काशीवाडी येथून १४, वडारवाडी येथून १४, पाटील इस्टेट येथून १६, महात्मा गांधी वसाहत येथून एक, लक्ष्मीनगर येथून तीन अशा एकूण ५९ मुली व नागरी वस्ती अभ्यास गटाच्या १२ कार्यकर्त्या अशा मिळून ७१ जणी मेळाव्यात सहभागी झाल्या. उपासना, चेतना व्यायाम, झूल झूल झेंडा झूल, जोडी साखळी हे खेळ, हातावर ढोलाचे दोन ताल, बर्ची नृत्याचा पहिला प्रकार, दोन प्रकारच्या कागदी टोप्या व छोटे आकाश कंदील करायला शिकवले. नागरी वस्ती अभ्यास गटाची कार्यकर्ती श्रद्धा गिरी हिने विविध जादूचे प्रयोग करून दाखवले. जुन्या मुलींपैकी काही मुलींनी स्वतःहून पुढे येऊन काही पद्ये सादर केली.

**किशोर मेळावा –** ज्ञान प्रबोधिनी भवनामध्ये सौर वैशाख ९ (२९ एप्रिल) रोजी किशोर मेळावा झाला. काशीवाडी येथून नऊ, वडारवाडी येथून चार, सातचाळ वसाहत येथून सहा, पाटील इस्टेट येथून सहा, महात्मा गांधी वसाहत येथून एक, शिवाजी नगर येथून सात व लक्ष्मीनगर येथून तीन असे एकूण ३८ किशोर व नागरी वस्ती अभ्यास गटाच्या बारा कार्यकर्त्या असे मिळून ५० जण मेळाव्यात सहभागी झाले. शैक्षणिक उपक्रम संशोधिका विभागातर्फे विज्ञान प्रयोग दाखवले. खेळ, वारली चित्रकला, आकाश कंदील याचे प्रशिक्षण झाले. नंतरच्या गटचर्चेच्या सत्रात प्रबोधिनीत आत्तापर्यंत काय शिकलो व अजून नवीन काय शिकायला आवडेल या विषयावर चर्चा झाली.

## संवादिनी

**हस्तकौशल्य कार्यशाळा –** 'निरामय' संस्थेने पुण्यातील वेगवेगळ्या पंधरा वस्त्यांमधील इ. ५वी ते १०वीच्या मुलींसाठी महर्षी कर्वे शिक्षण संस्था येथे शिबिर घेतले. त्याअंतर्गत संवादिनी गटाने त्या मुलींसाठी तीन तासांची हस्तकौशल्य कार्यशाळा घेतली. यामध्ये भरतकाम, ओरिगामी, रांगोळी काढणे, शुभेच्छा पत्रे बनवणे, टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणे इ. गोष्टी शिकवल्या. ही कार्यशाळा सौर ७ वैशाख (२७

एप्रिल) या दिवशी झाली. याला ४७५ मुली उपस्थित होत्या. संवादिनीच्या विविध उपक्रमांत काम करणाऱ्या २२ जणींनी ही कौशल्ये मुलींना शिकवली.

**विद्याव्रत संस्कार –** ज्ञान प्रबोधिनी प्रशालेबाहेरील विद्यार्थ्यांसाठी संवादिनी व संत्रिका या विभागांनी मिळून सौर ९ ते १५ वैशाख (दि.२९ एप्रिल ते ५ मे ) या कालावधीत विद्याव्रत संस्कारासाठी व्याख्याने व पूरक सत्रे घेतली. याला २० मुले व १४ मुली होत्या. सौर १५ वैशाख रोजी मा. महेंद्रभाई सेठिया यांनी व्रतार्थींना दीक्षा दिली.

## *ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला*

**अभिव्यक्ती सादरीकरण :** यंदाच्या वर्षी 'मुक्तछंद' या विषयाअंतर्गत प्रत्येक अभिव्यक्ती विषयाच्या गटाने त्यांच्या विचारांच्या अनुषंगाने मांडणी केली. गायन, वादनाच्या माध्यमातून राष्ट्रगीताच्या पुढील कडव्यांना वेगवेगळ्या प्रकारे चाली लावून त्याची मांडणी, तसेच यावर्षी अभिव्यक्ती विषयावरचे गीत प्रतिभाशाली लेखन गटातील मुलामुलींनी लिहिले व त्यास अध्यापकांच्या मदतीने चाल लावली व गायन गटातील मुलामुलींनी ते गायले. चित्रकला अभिव्यक्तीतील मुलामुलींनी कॅनव्हास पेंटिंगचा अनुभव घेतला व त्यावर बोटांनी चित्र रंगविली. ब्रशपेक्षा बोटांनी चित्र रंगविण्याचा वेगळा अनुभव मिळाला. शिल्पकला अभिव्यक्तीतील मुलामुलींनी यावर्षी पुण्यातील दोन उद्यानांच्या प्रतिकृती तयार करण्याचा अनुभव घेतला. यासाठी सौर चैत्र १९ ते वैशाख १ महिन्यातील (९ ते २१ एप्रिल) मध्ये तयारी व सरावासाठी शिबिर घेतले. सौर वैशाख ४ (२४ एप्रिल) रोजी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक पंडित अतुलकुमार उपाध्ये व सौर वैशाख ५ (२५ एप्रिल) रोजी विद्यार्थिनींच्या अभिव्यक्ती सादरीकरणाला सुप्रसिद्ध नृत्यांगना सौ. शमाताई भाटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## *ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर*

**प्राथमिक विभाग :** सौर चैत्र २२ (दि. १२ एप्रिल) रोजी अध्यापक गुणवत्ता विकासांतर्गत अध्यापक प्रशिक्षण झाले. 'परिस्थिती ज्ञानाची आवश्यकता का?' यावर मा. संचालकांनी मार्गदर्शन केले. दिव्य मराठीचे वरिष्ठ संपादक आप्पासाहेब हत्ताळे यांनी 'बातमी तयार होताना' यावर मार्गदर्शन केले. 'प्रमुख घटनांचा अभ्यास' यावर गटकार्य झाले. 'दैनंदिन अध्यापनात सद्य घटनांचा वापर' यावर सौ. सुनीताताई चकोत यांचे मार्गदर्शन झाले. अभ्यासक्रम व प्रमुख घटनांची सांगड (पोस्टर एक्सेल शीट) यावर गटकार्य झाले. 'अग्रलेखाचे महत्त्व' यावर श्री. सिद्धाराम पाटील यांचे मार्गदर्शन झाले. 'अग्रलेखाचा अभ्यास' या विषयावर श्री. अमोल गांगजी यांनी मार्गदर्शन केले व त्यानंतर गटकार्य झाले. गटशः सादरीकरण झाले.

**माध्यमिक विभाग :** सौर चैत्र २१ (दि. ११ एप्रिल) रोजी इ. ६वी ते ८वीच्या अभिव्यक्ती वर्गाचे सादरीकरण झाले. या कार्यक्रमास सोलापुरातील प्रसिद्ध गायक आ. श्री. श्रीकृष्ण महादेव खाडिलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. यावेळी वर्षभर अभिव्यक्ती वर्ग घेणाऱ्या कलाध्यापकांचा मा. मुख्याध्यापिका सौ. सुनीताताई चकोत व मा. अमोलदादा गांगजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मातीकाम व चित्रकला या दोन अभिव्यक्ती वर्गात तयार केलेल्या वस्तूंचे व चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

सौर वैशाख १२, १३ (२ व ३ मे) या दिवशी, शिशु अध्यापिका विद्यालयाला डिसेंबर २०१६ ला २५ वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने माजी विद्यार्थिनींच्या पुढाकाराने शहर व परिसरातील विविध ठिकाणी मातृभूमिपूजन, आरोग्य शिबिर, विज्ञान कार्यशाळा, बालकांसाठी गंमत खेळ, मनोरंजनात्मक कार्यक्रम, महिलांसाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम, किशोरवयीन मुलींसाठी शिबिर इ. विविध कार्यक्रम २५ ठिकाणी झाले. यांचा सांगता समारंभ बालशिक्षण चिंतन परिसंवादाने झाला. या परिसंवादात एकूण ३० शाळा सहभागी झाल्या होत्या व एकूण १३० अध्यापकांचा सहभाग होता. यावेळी दहा अध्यापकांनी विषयांची मांडणी केली. यात प्रामुख्याने पुढील विषय होते. बालशिक्षणात अनुभव शिक्षणाचे महत्त्व, माझ्या शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम, माझ्या शाळेतील उपक्रमांचे वेगळेपण , बालशिक्षिका म्हणून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल, बालवाडीतील मूल्यमापन पद्धती, बालवयातील पंचकोश विकसनाचा विचार व बालशिक्षणात संशोधनाची गरज.

## *ज्ञान प्रबोधिनी, निगडी*

**गुरुकुल :** या वर्षीच्या स्नेहसंमेलनात गीत रामायणावरील नृत्यनाटिका करावी असे ठरले. गीते निवडणे, संहिता लेखन, ध्वनिमुद्रण, नृत्य दिग्दर्शन, सराव या सगळ्याची जबाबदारी अनेक अध्यापक व स्नातक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे घेतली. अनेक दिवसांच्या सरावानंतर सौर वैशाख १० (३० एप्रिल) रोजी अतिशय सुंदर कार्यक्रम झाला. गुरुकुलातील सर्वच विद्यार्थी व अध्यापकांनी नृत्यनाटिकेत सहभाग घेतला. रत्नागिरी मध्ये तयार होत असलेल्या शिवसृष्टी चे काम बघणारे संदीप दादा हे गुरुकुल मध्ये खास मातीकाम शिकवण्यासाठी आले होते.

**क्रीडाकुल :** सौर वैशाख १४ (१४ मे) रोजी मनोहर सभागृहामध्ये क्रीडाकुलचे स्नेहसंमेलन झाले. अभ्यागत म्हणून निगडीतील नाट्यक्षेत्रातील सौ. ज्योतीताई कानिटकर उपस्थित होत्या. विभागातील सर्वच म्हणजे १२५ विद्यार्थ्यांचा समावेश असलेला नृत्य- नाट्य स्वरूपातील कलाविष्कार सादर झाला.

## *स्पर्धा परीक्षा केंद्र*

**UPSC/JKPSC मार्गदर्शन वर्ग–कुलगाम (जम्मू–काश्मिर) :** हा मार्गदर्शन वर्ग आता अंतिम टप्प्यात आला असून आत्तापर्यंत शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर परीक्षा झाली. त्याचप्रमाणे उरी येथे उरी महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन वर्ग घेण्यात आला.

**संशोधन –** स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी Critical Thinking Enhancement Programme ची रचना प्रा. सविताताई कुलकर्णी यांनी केली असून त्याचे शास्त्रीय पद्धतीने उपयोजन केले आहे. त्या संशोधनावर आधारित एक शोधनिबंध पुदुचेरी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये त्यांनी सादर केला. शोधनिबंधाचा विषय 'Gender Differences in Critical Thinking in Competitive Examination Aspirants' असा होता.

## *विस्तारकेंद्र डोंबिवली*

**विशेष उपक्रम – विद्याव्रत संस्कार**– सौर २८ चैत्र ते २ वैशाख (१८–२२ एप्रिल) दरम्यान प्रबोधक मंडळ, चंद्रशेखर साने विद्यालय, घारीवली व ज्ञानमंदिर शाळा येथील विद्यार्थ्यांचे विद्याव्रत शिबिर झाले. यात १९ मुली व १४ मुलगे सहभागी झाले होते. तेरा कार्यकर्त्यांचा सहभाग होता. त्यातील सहा कार्यकर्त्यांनी प्रथमच विद्याव्रताचा अनुभव घेतला. जोपासना गटातील सहा युवक–युवतींनीही काही जबाबदारी घेतली होती. घारीवली व ज्ञानमंदिर शाळा ग्रामीण व प्रबोधक मंडळातील मराठी व इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी असे ग्रामीण व शहरी एकत्र विद्याव्रत प्रथमच झाले. विशेष सत्रे–

१) रात्र महाविद्यालयातील दोन दादा व एक ताई यांनी गटात गप्पांमधून प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने शिक्षण पूर्ण करतानाचे त्यांचे अनुभव सांगितले.

२) अर्थभान– घरातील सदस्यांचे उत्पन्न, खर्च, बचत याचे नियोजन कसे करायचे याबद्दलची माहिती व प्रश्नोत्तरे झाली.

३) शोध– शुभा टोळे –न्युरोसायंटिस्ट, सोनम वाङ्चुक यांची माहिती.

४) व्यसनाधीनता– यावरील छोट्या चित्रफीती दाखवून त्यातील धोके, दुष्परिणाम यावर चर्चा. आचार्य म्हणून आ. ललितताई नामजोशी यांनी विद्याव्रतींना दीक्षा व आशीर्वाद दिले.

## *नेतृत्व संवर्धन केंद्र*

**गुजरात अभ्यास सहल :** विशेष उपक्रम – सौर वैशाख ४ ते १३ (२४ एप्रिल ते ३ मे) या कालावधीत केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी या अभ्यास सहलीचे आयोजन केले होते. सहलीच्या आयोजनाप्रमाणे गटाने ठरविलेली प्रमुख उद्दिष्टे – १) प्रशासन (Governance) हा विषय केंद्रस्थानी ठेवून गुजरातचा अभ्यास करणे व २) गुजरातमधील विविधांगी भौगोलिक व सामाजिक परिस्थितीमुळे तयार होणाऱ्या प्रश्नांचा व त्यावर उपाय शोधणाऱ्या संस्थांचा, चळवळींचा अभ्यास करणे.

अभ्यास सहलीमधील विशेष संस्था व व्यक्तीभेटींमध्ये कच्छमधील शेवटचे गाव ढोर्डो येथे गटशः फिरून गाव समजून घेतले. मांडवी येथील व्ही.आर.टी.आय. मध्ये श्री. गोवर्धन यांच्याशी गप्पा, सहा गटांनी केलेल्या गावभेटीत व्यापारी, मासेमारी करणारे, सामान्य नागरिक, पोलीस, राजकीय पक्ष कार्यकर्ते, जहाज बांधणी कामगार या सर्वांपर्यंत प्रशासन किती व कसे पोहोचले आहे याचा शोध. जामनगर येथे श्री. प्रदीप शेजूळ (एस्.पी., जामनगर) व सौ. शोभा भुतडा (एस्. पी, पोरबंदर) यांची भेट झाली.

## *संत्रिका*

**आंतरविद्याशाखीय अभ्यासगट व्याख्यान :** आंतरविद्याशाखीय चिंतन गटाच्या सदस्यांनी विविध अभ्यास विषयांची निवड करून दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सादरीकरण करण्याचे ठरले आहे. त्यातील पहिले व्याख्यान रश्मीताई जोशी यांचे ‘राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात महाराष्ट्रातील बाह्मण–ब्राह्मणेतर वाद’ या विषयावर झाले.

**मासिक वैचारिक** : दर महिन्याच्या वैचारिकांच्या मालिकेत सौर वैशाख १५ (५ मे) रोजी श्री. राजीव साने यांचे ‘नीतिशास्त्र व त्यामधील संकल्पना’ या विषयावर व्याख्यान झाले.

**पुस्तक छपाई** : ज्ञान प्रबोधिनीची धार्मिक संस्कारांमागील भूमिका स्पष्ट करणारे ‘धर्मविधिंच्या अंतरंगात’ हे पुस्तक छापून आले.

## *नैसर्गिक संसाधने विकास विभाग*

**पाणीटंचाई निवारण कार्यक्रम :** वांगणीची वाडी, शेनवड–बार्शीचा माळ आणि गुंजवणे–दरडिगेवस्ती (ता. वेल्हे) येथील विहीर खोदाईचे काम पूर्ण झाले आहे. या तीनही कामांसाठी पर्सिस्टंट फौंडेशनने आर्थिक मदत देऊ केली आहे. डेहेण–कोंडगाव (ता. भोर) येथील विहिरीचे खोदकाम पूर्ण झाले असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. या कामासाठी सुमंत मुळगावकर फौंडेशनने मदत केली आहे.

**फेरोसिमेंट टाकी बांधणी :** कांबरे (बु) (ग्रा.पं सांगवी, ता. भोर) येथे १५ हजार लीटर क्षमतेची पाण्याची फेरोसिमेंट टाकी बांधून पूर्ण करण्यात आली आहे. या टाकीच्या बांधकामाचा सांगाडा उभारण्यासाठी ग्रामस्थांनी योगदान दिले आहे.

## *स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)*

**स्वयंरोजगार :** गेल्या काही महिन्यात स्वयंरोजगार मासिक बैठक वेल्ह्याला सुरू केली. त्यात मावळ भागातल्या महिलांना उन्हाळी वाळवण पदार्थ करायला सांगितले व त्याची विक्री एक दिवस प्रबोधिनीमध्ये केली. अनेकींचा अशा प्रकारच्या उत्पादनाचा पहिला अनुभव होता. पुण्यात साधारण ६,०००/– रुपयांची विक्री झाली. यासाठी वेल्ह्यातून सहाजणी विक्रीचा अनुभव घ्यायला आल्या होत्या. छोटी छोटी कौशल्य प्रशिक्षणे घेतली तर स्वयंरोजगार करावासा वाटतो, असे वाटण्यासाठी कुम्बळ्याला करवंद लोणच्याचे प्रशिक्षण घीसरच्या सुलाताई धिंडले यांनी दिले तर मार्गासनी मध्ये दहाजणी शिवण वर्ग प्रशिक्षण घेत आहेत.

**गाववार वासंतिक मेळावे** – किशोरी मेळावे घेणाऱ्या ३५ युवतींची प्रशिक्षक बैठक झाली. त्या नंतर सौर चैत्र २० ते वैशाख ६(१० ते २६ एप्रिल) या कालावधीत ३७ गावात गाववार वासंतिक मेळावे झाले. त्यात ११२७ मुले–मुली सहभागी झाली होती. या पैकी दहा गावे हराळी केंद्राची होती. हराळी येथे मेळावे कसे घ्यायचे याचे प्रात्यक्षिक दाखवायला वेल्हे केंद्रातील चार युवती व दोन हिरकणी अश्विनीताई ठाकर यांच्याबरोबर गेल्या होत्या. युवतींनी तिथल्या युवती सोबत मुलांचे मेळावे घेतले तर हिरकर्णींनी जवळच्या चार गावात हिरकणींचे मेळावे घेतले.

**आरोग्य :** आपण ग्रामीण भागात ज्येष्ठ महिलांसाठी कॅन्सर संदर्भात जागृती कार्यक्रम घेतो. डॉ शुभांगी कानिटकर व डॉ. विद्या माणकीकर या कार्यकर्ता वृत्तीने नियमितपणे येतात. या वर्षी दहा कार्यक्रम झाले. यामध्ये १७३ जणी व्याखान ऐकायला आल्या तर ११४ जणींनी गर्भाशया

संबंधी तक्रारी संदर्भात तपासणी केली तर ८२ जणींनी पॅप स्मिअरची तपासणी करून घेतली. या तपासणीमुळे अनेकींवर वेळेवर उपचार होऊ शकले ज्यामुळे त्यांचे आयुष्य वाढले आणि अधिक सुखकर झाले. आपण अशा तपासणीची योजना केली नसती तर कदाचित यातल्या कोणी दावाखान्यातही गेल्या नसत्या.

## *ज्ञान प्रबोधिनी, हराळी*

**विद्यालय व गुरुकुल –** विद्यालयाच्या परीक्षा संपल्यानंतर सौर चैत्र २५ ते २७ (१५ ते १७ एप्रिल) या काळात विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. तसेच १८ ते २१ एप्रिल या कालावधीत कला शिबिर आयोजित करण्यात आले होते. पुणे प्रशालेतील १०वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा एक गट या काळात हराळी केंद्राला भेट देण्यासाठी आलेला होता. या विद्यार्थ्यांच्या मदतीने कला शिबिराच्या शेवटच्या दिवशी हराळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पालकांसमोर कला सादरीकरण केले.

**कृषी विद्यालय व शेती –** सौर चैत्र २५ ते २९(१५ ते १९ एप्रिल) या कालावधीत शिक्षकांचे इंग्रजी भाषा प्रशिक्षण झाले. या प्रशिक्षणामध्ये प्रा. हेमाताई होनवाड यांनी मार्गदर्शन केले. सौर वैशाख ५ व ६ (२५ व २६ एप्रिल) रोजी श्री. प्रशांत दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विद्यालयाच्या विषय नियोजनाच्या कामाची सुरुवात झाली.

**पूरक शिक्षण – किशोरी विकास–** सौर वैशाख ३ ते ५ (२३, २४ व २५ एप्रिल) या कालावधीत दहा गावांमध्ये किशोरी शिबिरे घेण्यात आली. गावांमधील साधारण ३०० मुली यात सहभागी झाल्या. शिबिरामध्ये गणिती खेळ, हस्तकौशल्य, मैदानी खेळ, पद्यगायन इत्यादी सत्रे घेण्यात आली. ही शिबिरे घेण्यासाठी वेल्हे वसतिगृहातील चौघीजणी आल्या होत्या.

**जल संधारण –** सौर चैत्र २८ (१८ एप्रिल) ला सास्तूर गावातील ओढ्याच्या खोलीकरणाचे काम लोकसहभागातून हाती घेण्यात आले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. आत्तापर्यंत सुमारे दीड किमी लांबीचे काम झाले असून ४०,००० घन मी. इतका गाळ काढण्यात आला आहे. सौर वैशाख ११ (१ मे) ला मा. सुभाषरावांची सास्तूरच्या शेतकऱ्यांबरोबर बैठक झाली. तावशी व काटे चिंचोली या गावातही खोलीकरणाचे काम चालू आहे.

## *युवक विभाग, पुणे*

**किशोर आंतरदलीय सामने –** सौर वैशाख ९ (२९ एप्रिल) रोजी किशोर दलांचे आंतरदलीय सामने स्काउटच्या मैदानावर झाले. एकूण दहा दलांमधील ३२५ पेक्षा अधिक युवक आणि त्यांचे ३० मार्गदर्शक यांनी अत्यंत उत्साहात सहभाग घेतला. तीन सांघिक खेळांचे चुरशीचे सामने आणि कडक शिस्तीत संचलन स्पर्धा झाली. विजेत्यांना बक्षीसवितरण केल्यानंतर 'यापुढे यशाकडे' हे पद्य म्हणून कार्यक्रमाचा समारोप झाला.

**दुष्काळी श्रमदान –** बार्शीचा माळ या गावात झालेल्या श्रमदानात बोस दलाच्या चौदा, साराभाई दलाच्या चार, आझाद दलाच्या बारा, चाणक्य दलाच्या युवक गटातील आठ, टिळक व भगतसिंह दलाच्या प्रत्येकी दोन अशा एकूण ४२ युवकांनी सहभाग घेतला. त्या व्यतिरिक्त मराठवाड्यात अंबाजोगाई परिसरात मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या श्रमदानात सहभाग घेण्यासाठी सुमित पाटील, सूरज जाधव व आराध्य वेर्णेकर (बोस दल) व सुरेश मरगळे (आझाद दल) हे युवक रवाना झाले आहेत. प्रत्येकजण तेथे किमान आठवडाभर तरी सहभागी होत आहे.

**दौरे –** साराभाई दलावरचे नऊ युवक सौर चैत्र २९ ते वैशाख १५ (१९ एप्रिल ते ५ मे) या कालावधीत आसाम अभ्यास दौऱ्याला गेले होते. माजुली येथे पाच दिवसांचे शिबिर झाले. विवेकानंद केंद्राच्या आसाममध्ये सुमारे २५ शाळांमध्ये संशोधनात्मक प्रकल्प पद्धतीचे प्रशिक्षण देण्याकरता हे शिबिर आयोजित केले होते. या सर्व शाळांमधील निवडक ५२ मुले आणि १४ शिक्षकांनी या शिबिरांमध्ये सहभाग नोंदवला. या शिवाय गुवाहाटीत स्थानिक जमातींसाठी संकेत स्थळ बनवण्याची प्रशिक्षण कार्यशाळा वनवासी कल्याण आश्रमाच्या २० कार्यकर्त्यांसाठी झाली. दौऱ्याचा भाग म्हणून गटाने कोलकात्यामध्ये आणि आसाममध्ये दिग्बोई, जोरहाट, दिब्रुगड व गुवाहाटी या विविध ठिकाणी क्षेत्रभेटी आणि व्यक्तिभेटी केल्या.

## *युवती विभाग, पुणे*

**शालांत परीक्षा झालेल्या युवतींचा कर्नाटक अभ्यास–दौरा –** कालावधी– सौर १४ ते १९ वैशाख (४ ते १० मे)

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतून इयत्ता दहावीची परीक्षा दिलेल्या युवतींचा कर्नाटक दौरा आयोजित केला होता. या गटात बारा मुली व चार मार्गदर्शिका यांचा सहभाग होता. त्या ठिकाणचा सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक अशा विविध आयामांनी अभ्यास करणे हा या दौऱ्याच्या मागचा मुख्य उद्देश होता. या दौऱ्या दरम्यान कर्नाटकातील बिजापूर, बदामी, पट्टडकल, ऐहोळ व हुबळी या ठिकाणी असणाऱ्या मुख्य संस्था भेटी म्हणजे हुबळीतील देशपांडे फाऊंडेशन, अक्षयपात्र योजनेचे काम व राष्ट्रध्वज उत्पादन केंद्र. देशपांडे फौंडेशनचे एकूण काम पाहून आणि व्यवसायाचे प्रशिक्षण देताना आर्थिक नफा कमावण्यावर दिला जाणारा भर ऐकून, मुलींचे प्रबोधिनीच्या आर्थिक व्यवस्थेबद्दल कुतूहल जागृत झाले. देशभरात राष्ट्रध्वजाचे वितरण करणाऱ्या राष्ट्रध्वज उत्पादन केंद्रात जेव्हा चाहूबाजुंना फक्त आपला राष्ट्रध्वज दिसला तेव्हा स्वाभाविकच अभिमानाची व देशभक्तीची भावना सर्वांच्या मनात दाटून आली व आपल्या देशासाठी काम करायचे आहे या मनातील निश्चयाला नवी उभारी मिळाली. दौऱ्यात घेतलेल्या अनुभवांनंतर आम्हाला देशसेवा म्हणजे नक्की काय करायचं आहे? काय करता येईल? अशी विचार प्रक्रिया सुरू झाली असे नक्की वाटते.

***

# ✻ सौर वैशाख १९४० मधील उपक्रमांची छायाचित्रे ✻




केंद्रीय मंत्री डॉ. हर्षवर्धन यांच्या हस्ते 'जैवतंत्रज्ञान सामाजिक विकास पुरस्कार स्वीकारताना प्रा. संगीताताई कुलकर्णी



'चिरवसंत स्मृतिवन' या स्मरणिकेचे प्रकाशन



रोटरी लोकमान्य दिवाळी अंक २०१७ चा पुरस्कार सोहळा



कै. काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजकता पुरस्काराचे वितरण



ज्ञान प्रबोधिनी, निगडी, गुरुकुल : गीत रामायणावर आधारीत नृत्यनाटिकेचे सादरीकरण



स्त्री शक्ती प्रबोधन, ग्रामीण : किशोरी मेळावा

शैक्षणिक उपक्रम संशोधिका :
www.learnprabodhiniway.com ह्या
पोर्टलच्या ध्वनीमुद्रणात सहभागी गट





नैसर्गिक संसाधने विकास विभाग :
कांबरे (बु) (ग्रा.पं सांगवी, ता. भोर) टाकी बांधकामासाठी ग्रामस्थांचे सहकार्य

नागरी वस्ती विकास विभाग : किशोर मेळाव्यात
विज्ञान प्रयोग दाखविताना





ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
: अभिव्यक्ती सादरीकरण